# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक ०६.१२.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक ५० :-** मौजा बडनेरा, सर्व्हे क्र. २७३ मधील महानगरपालिकेच्या मालकीची क्षेत्र १.२५ हे आर. जागा श्री. गजानन महाराज शिक्षण संस्था, अमरावती यांना शैक्षणिक व क्रिडांगण विकासाकरीता नाममात्र भाडेपट्टाने देण्या बाबत.

**ठराव क्रमांक ५० :-** श्री. गजानन महाराज शिक्षण संस्था, अमरावती यांनी दिनांक २२/११/२०२२ रोजीचे पत्रा नुसार मौजा-बडनेरा सर्व्हे क्र. २७३ मधील महानगरपालिकेच्या मालकीची क्षेत्र १.२५ हे.आर. जागा शैक्षणिक व क्रिडांगण विकासा करीता भाडेपट्टाने निशुल्क देण्या बाबत विनंती केलेली आहे.

मौजा-बडनेरा सर्व्हे क्रमांक २७३ मधील क्षेत्र १.२५ हे.आर. जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे. अमरावती शहराचा मंजुर विकास योजना (सु.) मध्ये मौजा-बडनेरा, सर्व्हे क्र. २७३ मधील क्षेत्र १.२५ हे. आर. जागा Site & Services (Site No. ३०५ A) करिता दर्शविलेली आहे. तसेच प्रारुप विकास योजना (दुसरी सुधारीत) मध्ये सदर्हु जागा निवासी वापर क्षेत्रात दर्शविलेली आहे.

अर्जदार संस्था ही रजि. क्र. MAH-५८१२(AMV)F-५९१६/AMT अन्वये संस्था नोंदणी अधिनियम १८६० नुसार नोदणीकृत संस्था आहे. अर्जदार संस्थेस उक्त जागा नि:शुल्क मिळाली तर भाडेतत्वावर संचालित महाविद्यालय सदर जागेवरती स्थानांतरित करता येईल व लगतच्या ग्रामीण भागातील व शहरी भागातील गरीब मुला-मुलींना उच्च शिक्षणा सोबतच खालील फायदे होतील असे अर्जदार संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावा मध्ये नमुद केलेले आहे.

१) संस्थेला कला शाखेबरोबरच ग्रामीण भागातील व शहरी भागातील गरीब विद्यार्थ्यांना विविध जसे वाणिज्य, विज्ञान, शाखेतुन व कौशल्य आधारित शिक्षण देण्याचा उद्देश आहे.

२) प्राथमिक शिक्षण, औद्योगिक शिक्षण व कौशल्य विकास आधारित शिक्षण देण्याच्या संस्थेच्या उद्देश आहे.

३) मुला-मुलींच्या शैक्षणिक विकास बरोबरच त्यांचा सर्वांगिण विकास होणे गरजेचे आहे. या दृष्टीकोनातुन ग्रामिण भागातील मुला-मुलींसाठी विविध खेळांकरीता क्रीडांगणे विकसित करणे संस्थेचा उद्देश आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९ (ग)(चार) च्या तरतुदीनुसार मौजा- बडनेरा, सर्व्हे क्रमांक २७३ येथील अमरावती महानगरपालिकेचे मालकीची क्षेत्र १.२५ हे. आर. जागा शैक्षणिक प्रयोजनासाठी श्री. गजानन महाराज शिक्षण संस्था, अमरावती यांना नाममात्र भाडेपट्टाने रुपये १/- प्रती चौ.फुट अधिमुल्य प्रतिवर्ष दराने, ३० वर्षाच्या कालावधींकरिता उपलब्ध करुन देण्यास राज्य शासनाची मान्यता अनिवार्य आहे. त्या अनुषंगाने सर्वसाधारण सभेची मंजुरी नंतर शासनाच्या

मान्यते करीता प्रस्ताव सादर करण्याचे प्रस्तावित आहे. उक्त प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दिनांक ०६/१२/२०२२ रोजीला मंजुरी दिलेली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरी करीता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा/-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.